पुण्यनगरी पा.नं ३.

# राष्ट्रपुरुषांचा अवमान रोखण्यासाठी कायदा करा! – खा. उदयनराजे



**सातारा :** छत्रपती शिवाजी महाराज देशाचे प्रेरणास्थान आहेत. गेल्या काही दिवसांत छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत सातत्याने अवमानजनक वक्तव्ये झाली आहेत. त्यांचा कोणी अवमान करत असेल तर त्याच्यावर कडक कारवाई झालीच पाहिजे. त्यासाठी हिवाळी अधिवेशनात कायदा आणावा, अशी मागणी भाजपचे राज्यसभा खासदार उदयनराजे भोसले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचा काही विकृत प्रवृत्तींकडून वारंवार अवमान केला जात आहे. ज्या राष्ट्रपुरुषांनी राष्ट्र उभारणीत सर्वस्व पणाला लावले, त्यांचाही सातत्याने अवमान होत आहे. अशा विकृतींना आळा घातला पाहिजे. यासाठी कायदेतज्ज्ञ आणि अभ्यासकांशी चर्चा करून कच्चा मसुदा तयार केला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अधिकृत इतिहास जगासमोर येण्यासाठी राज्य आणि केंद्र शासनाने व्यापक समिती नेमून खरा इतिहास नव्याने मांडला पाहिजे. हा इतिहास खंड रूपात प्रकाशित करावा.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र आणि कार्य संपूर्ण जगासमोर नेण्यासाठी तसेच नव्या पिढीला प्रेरणा देण्यासाठी नवी दिल्ली येथे छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय स्मारक उभारावे. राज्यशास्त्र, प्रशासन, व्यवस्थापनशास्त्र, वास्तुशास्त्र, कायदा, अर्थशास्त्र अशा विविध क्षेत्रांतील अभ्यासकांसाठी हे स्मारक मोलाचा दगड ठरू शकतो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर तसेच त्यांच्या ऐतिहासिक प्रसंगावर आधारित अनेक सिनेमे, टीव्ही सिरियल्स, वेबसीरिज, डॉक्युमेंटरी प्रदर्शित होतात. सेन्सॉर बोर्डाकडून अनेकदा वादग्रस्त बाबींकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे. त्यामुळे खोटा इतिहास पसरवला जात आहे. त्याला आळा घालण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने मिळून सेन्सॉर बोर्डाला मदत करणारी इतिहास संशोधक, अभ्यासक तसेच तज्ज्ञांची एक समिती नेमावी.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासात प्रतापगडाचे महत्त्व फार मोठे आहे. या ठिकाणी शिवाजी महाराजांनी घडवलेला शौर्याचा इतिहास जतन करण्यासाठी राज्य सरकारने प्रतापगड विकास प्राधिकरण स्थापना करावी. या पत्रातील मागण्या केंद्र व राज्य सरकार पूर्णत्वास नेईल, अशी आशाही उदयनराजेंनी वर्तवली आहे.

पुढारी पु-पा.२.

# महागड्या सायकल चोरणाऱ्याला अटक

## ११ सायकल जप्त



**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

आचोळे पोलीस ठाणे हद्दीत महागड्या सायकल चोरी करणाऱ्या १८ वर्षीय मुलाला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून ११ सायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

आचोळे पोलीस ठाणे हद्दीत राहणारे श्याम शंकर पाटील यांचा मुलगा स्मशानभूमी रोड, एव्हरशाईन, नालासोपारा येथील रस्त्यावर सायकल उभी करून पात्र विधीसाठी गेला असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्याची सायकल चोरुन नेली होती. त्याबाबत आचोळे पोलीस ठाण्यात १७ डिसेंबर रोजी भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. वसई- नालासोपारा परिसरात तसेच आचोळे पोलीस ठाणे हद्दीमध्ये सायकल चोरीचे गुन्हे अनेक घडत आहेत. हे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठांनी चोराचा शोध घेण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे आचोळे पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार गस्त करत असताना १८ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास नालासोपारा पूर्व येथील वसंतनगरी ते आचोळे गावाकडे जाण्याच्या रस्त्यावर एक मुलगा सायकल चालवत घेऊन जात असताना मिळून आला. त्याला थांबवून त्या सायकलबाबत विचारपूस केली असता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. त्यामुळे त्याला सायकलसह पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्यावेळी चोरी गेलेली हीच असल्याचे दिसून आले. आरोपी राजकुमार गिरीष मेवाडा याने ती सायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली.

सामना पा.नं.७.

# रिक्षात खोटी माहिती लावल्यास कारवाई

## पोलीस निरीक्षकांचे कर्मचाऱ्यांना आदेश

भाईंदर, दि. २० (सा.वा.) - संकटाच्या काळात महिला प्रवासी तसेच अन्य प्रवाशांनादेखील तातडीने मदत मिळावी यासाठी मीरा-भाईंदरमधील रिक्षांमध्ये चालकाची व मालकाची सविस्तर माहिती लावण्यात आली आहे. पण अनेक रिक्षाचालक पत्ता, फोन नंबर व अन्य आवश्यक माहिती खोटी देत असल्याचे आढळून आले आहे. रिक्षामध्ये पत्रकात दिलेली माहिती यापुढे खोटी असल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर कडक कारवाई केली जाणार आहे. वाहतूक शाखेच्या पोलीस निरीक्षकांनी तसेच आदेशच कर्मचाऱ्यांना दिले आहेत.



रिक्षांमधून प्रवास करणाऱ्या महिलांवर एखादा प्रसंग ओढवल्यास त्यांना त्वरित मदत मिळावी यासाठी हेल्पलाईन क्रमांक लावण्यात येतो. त्याशिवाय प्रवाशांना दिसेल अशा ठिकाणी एका फॉर्मवर वाहनचालकाचे नाव, संपूर्ण पत्ता, फोन नंबर, लायसन्स नंबर, परमीटधारकाचे नाव, आधार कार्ड क्रमांक अशी सविस्तर माहिती लावण्यास सांगितले आहे. या माहितीमुळे ही रिक्षा नेमकी कोणाची आहे याचा त्वरित थांगपत्ता लागतो. मात्र शहरातील काही रिक्षांमध्ये फॉर्मवर अर्धवट माहिती असल्याचे दिसून येते. तर तपासामध्ये अनेकदा खोटी माहितीही दिल्याचे पोलिसांच्या लक्षात आले आहे.

### हेल्पलाईन क्रमांकाचे स्टिकर लावणे बंधनकारक

प्रवाशांची मागणी तसेच गरज लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक रमेश भामे यांनी शहरातील सर्व रिक्षांची तपासणी करणार असल्याचे सांगितले. तसेच ज्या रिक्षांमध्ये अर्धवट किंवा चुकीची माहिती असेल तर कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले. रिक्षांमध्ये हेल्पलाईन क्रमांकाचे स्टिकर लावणे तर बंधनकारक असून याबाबत कोणतीही हयगय सहन केली जाणार नाही, असा इशारा वाहतूक पोलिसांनी दिला आहे.

पुढारी पु.पा.२.

# मिरा-भाईंदरमध्ये तक्रार निवारण दिन

**मिरारोड** - मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नागरिकांनी केलेल्या तक्रारींवर यथोचित कार्यवाही झालेली आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी तसेच ज्या तक्रारदारांचे पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर समाधान झालेले नाही अशा तक्रारदारांसाठी आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाण्यात दर शनिवारी सकाळी दहा ते साडे अकरा या वेळेत तक्रार निवारण दिन राबवण्यात येणार आहे. यावेळी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांच्या समोर तक्रारींचे निवारण करण्यासाठी जास्तीत जास्त पोलीस अधिकारी, अंमलदार पोलीस ठाण्यात हजर राहणार आहेत. तसेच विभागीय सहायक पोलीस आयुक्त हे देखील त्यांचे कार्यक्षेत्रातील एका पोलीस ठाण्यात तक्रार निवारण दिनाच्या दिवशी हजर राहून तक्रारदारांचे तक्रारींवर कार्यवाही करण्याचे अनुषंगाने मार्गदर्शन करणार आहेत. या उपक्रमावर परिमंडळ पोलीस उप आयुक्त यांचे नियमित नियंत्रण व मार्गदर्शन राहणार आहे. त्याचप्रमाणे परिमंडळातील ज्या तक्रारदारांचे पोलीस ठाण्यात झालेल्या सुनावणी वेळी तक्रारीचे समाधान झाले नाही त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी पोलीस उपआयुक्त यांचे कार्यालयामध्ये सोमवार ते शुक्रवार दुपारी ३ ते ५ या वेळेमध्ये भेट घेता येणार आहे. त्यामुळे तक्रारदारांचे पोलीस ठाण्यात समाधान न झाल्यास त्यांनी संबंधीत पोलीस उपायुक्त यांच्याकडे तक्रार करावी याबाबत सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. पोलीस उपायुक्तांकडे समक्ष तक्रार मांडण्यासाठी काशिमिरा, नयानगर, मिरारोड, नवघर, भाईंदर, उत्तन हद्दितील तक्रारदारांनी लक्ष्मी पार्क, कनाकिया रोड मिरारोड पुर्व येथील पोलीस उपआयुक्त कार्यालय, परिमंडळ-१, वसई, माणिकपूर, वालीव, तुळींज, आचोळे पोलीस ठाणे हद्दितील तक्रारदारांनी वसई रेल्वे स्टेशन जवळ, वर्तक कॉलेज समोर, वसई पश्चिम येथील पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ तसेच विरार, अर्नाळा, नालासोपारा, पेल्हार , मांडवी या पोलीस ठाणे हद्दितील तक्रारदारांनी रिध्दीसिध्दी अपार्ट, वसई- नालासोपारा लिंक रोड, वसंतनगरी नालासोपारा पूर्व येथील पोलीस उपआयुक्त परिमंडळ - ३ येथील कार्यालयामध्ये संपर्क साधावा.

पुढारी पु. पा. ४.

# उत्तनमधील शासकीय जागेतच मेट्रो कारशेड होणार

## हिवाळी अधिवेशनात आ. प्रताप सरनाईक यांची मागणी मान्य

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदरच्या मुर्धा, राई व मोर्वा गावातील सुमारे ३५ हेक्टर जमिनीवर प्रस्तावित असलेल्या मेट्रो कारशेडला स्थानिकांचा तीव्र विरोध आहे. हे कारशेड उत्तन येथील शासकीय जमिनीवर प्रस्तावित करण्यात यावी, यासाठी आमदार प्रताप सरनाईक यांनी नागपूर येथे सुरू असलेल्या राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात या कारशेडचा मुद्दा मंगळवारी उपस्थित केला. तसेच त्यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत चर्चा केली असता मुख्यमंत्र्यांनी त्याची दखल घेत सरनाईक यांची मागणी मान्य केली. भाईंदर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानाजवळून पुढे उत्तनपर्यंत मेट्रो नेली जाणार असून उत्तन येथील शासकीय जमिनीवर कारशेड बनविण्यात येईल, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्याची माहिती सरनाईक यांनी दिली.

कारशेडला विरोध असलेल्या स्थानिकांना दिलासा मिळाला आहे. भाईंदर पश्चिमेच्या मुर्धा, राई व मोर्वा गावातील सुमारे ३५ जागेत मेट्रो कारशेडचे आरक्षण नवीन प्रारूप शहर विकास आराखड्यात टाकण्यात आले आहे. तत्पूर्वी हे कारशेड याच गावात साकारण्याचा निर्णय एमएमआरडीएकडून घेण्यात आला होता. कारशेडच्या जागेची तपासणी देखील एमएमआरडीएकडून करण्यात आली. या कारशेडमुळे गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनींसह घरे आदी ४२८ बांधकामे बाधित होत होती. त्यामुळे प्रस्तावित कारशेडला गावातील ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवून कारशेडविरोधात भूमिपुत्र सामाजिक समन्वय संस्थेच्या माध्यमातून जनआंदोलन छेडण्याचा निर्णय घेतला.

ग्रामस्थांनी सरनाईक यांची भेट घेत कारशेड उत्तन येथील शासकीय जागेतच बांधण्यात यावी, अशी मागणी केली. स्थानिकांची वडिलोपार्जित घरे तोडून, त्यांच्या शेत जमिनीवर कारशेड बांधण्या विरोधात सरनाईक यांनी सातत्याने ग्रामस्थ व भूमिपुत्रांची बाजू सरकारदरबारी तसेच मागील अधिवेशनांमध्ये लावून धरली. भूमिपुत्रांच्या बाजूनेच सरकार निर्णय घेणार, या आशेने सरनाईक यांचे प्रयत्न सुरु होते.

### मुख्यमंत्र्यांच्या निर्णयामुळे ग्रामस्थांना दिलासा

मेट्रो विकास आराखड्यात गावातील कारशेडच्या आरक्षणाविरोधात ग्रामस्थांकडून ११७१ हरकती कोकण विभागीय आयुक्तांकडे दाखल करण्यात आल्या होत्या. गावातील प्रस्तावित कारशेडमुळे स्थानिकांची बांधकामे, शेतजमिनी व घरे मोठ्याप्रमाणात बाधित होणार होती. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्णयामुळे ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांना ३० मीटर रस्ता रुंदीकरणासाठी मात्र एक पाऊल मागे घ्यावे लागणार आहे. कारण हा रस्ता ३० मीटर ऐवजी १८ मीटरपर्यंतच रुंद करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली होती. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी ७ डिसेंबर रोजी पार पडलेल्या बैठकीत तूर्तास १८ मीटर रस्ता तयार करण्याचे निर्देश एमएमआरडीएला दिले होते.

> ग्रामस्थांनी मुख्य रस्त्याच्या रुंदीकरणाऐवजी गावामागील प्रस्तावित २४ मीटर रस्त्याचे ३० मीटर रुंदीकरण करून त्यामार्गे मेट्रो प्रस्तावित केल्यास गावातील जमिनी बाधितांचे सर्व प्रश्न निकाली निघणार आहे.
>
> **- अशोक पाटील,**
> अध्यक्ष, भूमिपुत्र सामाजिक समन्वय संस्था

अलिकडेच भाईंदर पूर्वेच्या ठाकरे मैदानात पार पडलेल्या कला महोत्सवाला मुख्यमंत्र्यांनी हजेरी लावली असता त्यावेळी सुद्धा सरनाईक यांनी कारशेडचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन त्यांना दिले होते. सध्या सुरू असलेल्या नागपूर हिवाळी अधिवेशनात सरनाईक यांनी प्रश्नोत्तराच्या तासात कारशेडचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. मात्र विरोधकांनी सभागृहात गोंधळ घातल्याने कारशेडचा मुद्दा चर्चेला आला नाही. यानंतर सरनाईक यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन कारशेडच्या मुद्द्यावर चर्चा केली. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी सरनाईक यांची मागणी मान्य करीत मुर्धा, राई व मोर्वा गावात स्थानिकांचा विरोध डावलून त्यांच्या जमिनीवर टाकलेले मेट्रो कारशेडचे आरक्षण रद्द करण्याचे स्पष्ट केले. ही कारशेड उत्तन येथील शासकीय जमिनीवर प्रस्तावित करण्यासाठी एमएमआरडीएला नवीन प्रस्ताव तयार करून तो नगरविकास विभागाकडे पाठविण्याचे आदेश देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांकडून सांगण्यात आल्याची माहिती सरनाईक यांनी दिली.


भाईंदर पश्चिमेच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत येणारी मेट्रो पुढे उत्तनपर्यंत जाणार असल्याने उत्तनमधील ग्रामस्थांना देखील मेट्रोचा फायदा होणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. यामुळे तेथील पर्यटनात वाढ होणार असल्याचा दावा त्यांनी केला. बोस मैदानापासून पुढे मेट्रो नेण्यासाठी तसेच उत्तन येथे कारशेड प्रस्तावित करण्यासाठी सरकारवर अतिरिक्त ४ ते ५ हजार कोटींचा बोजा येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

उत्तन येथील प्रस्तावित शासकीय जमिनीवर तेथील डोंगर पोखरून कारशेड साकारण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. बोस मैदानापासून पुढे उत्तनपर्यंत जाणाऱ्या मेट्रोकरीता तेथील मुख्य रस्ता अधिक रुंद करावा लागणार असल्याने हा रस्ता १८ मीटर ऐवजी ३० मीटर रुंद करण्याशिवाय पर्याय नसल्याचे एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

सामना पा.नं.२०

# कर्नाटकला वठणीवर आणण्यासाठी कोयना-वारणा धरणाची उंची वाढवा

## जयंत पाटील सीमा प्रश्नावर आक्रमक | कर्नाटकला त्याच भाषेत उत्तर द्या



*आपल्या* राज्यातील पाणी आपल्याच हातात आहे. त्यामुळे कोयना, वारणा आणि सातारा जिल्ह्यातील धरणाची उंची वाढवा. त्याशिवाय कर्नाटक वठणीवर येणार नाही. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर द्यायला हवे, अशी आक्रमक भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे जयंत पाटील यांनी आज विधानसभेत घेतली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार हसन मुश्रीफ यांच्यावर झालेला हल्ला व सीमा प्रश्न जयंत पाटील यांनी विधानसभेत स्थगन प्रस्तावाद्वारे उपस्थित केला.

सीमा भागात मराठी बांधवांचे संमेलन भरवण्यात आले होते. या संमेलनात महाराष्ट्रातील एकही नेता पोहोचणार नाही अशी व्यवस्था कर्नाटक सरकारने केली होती. हसन मुश्रीफ तेथे गेले असता त्यांच्यावर लाठी उगारली गेली. हे अत्यंत चुकीचे आहे, अशी खंत जयंत पाटील यांनी व्यक्त केली.

सीमा भागातील मराठी माणसांवर पाळत ठेवली जात आहे, जाणीवपूर्वक मराठी माणसाला त्रास दिला जातोय. आपण याचा जाब विचारला पाहिजे, कर्नाटकचे मुख्यमंत्री ज्या भाषेत बोलत आहेत त्याच भाषेत त्यांना उत्तर द्यायला पाहिजे, अशा शब्दांत जयंत पाटील यांनी कर्नाटक सरकारला ठणकावले.

महाराष्ट्राला वेठीस धरण्याचे काम खपवून घेऊ नका, असे राज्य सरकारलाही त्यांनी सुनावले.

# श्रद्धा वालकर प्रकरणाची विशेष पोलीस पथकामार्फत चौकशी

## देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

## शक्ती कायदा कधी येणार? सुनील प्रभू यांचा सवाल

*श्रध्दा* वालकर प्रकरणी विशेष पोलीस पथकाची नियुक्ती करुन चौकशी करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री आणि राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत केली.

### सरकारची संथ कारवाई

श्रद्धा वालकरच्या झालेल्या निर्घृण हत्येप्रकरणी लक्षवेधी सुचना मांडण्यात आली होती. त्यावरील चर्चेत भाग घेताना शिवसेना आमदार सुनील प्रभू म्हणाले की,

ही सामजिक घटना आहे. आतापर्यंत महिला, मुलींवर परिचितांकडून अत्याचार होत आहेत.सरकारने यामध्ये समाज प्रबोधनासाठी काय केले. महिलांवरील खटले जलदगतीने झाले पाहिजेत. शक्ती कायदा कधी येणार? अशा या नराधमांना शिक्षा करण्यासाठी कठोर कायदा करणे गरजेचे आहे. पण सरकार संथ गतीने सर्व कार्यवाही करीत आहे.

### श्रध्दा वालकर प्रकरणाची पुनरावृत्ती?

श्रध्दा वालकर प्रकरणाची पुनरावृत्ती घडण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. भाईंदर पोलिस ठाण्यात एका मुलीच्या भावाने तक्रार नोंदवली आहे. भाईंदर पोलिस त्या मुलीशी संपर्क साधत आहेत. पण नातेवाईक म्हणतात या मुलीच्या बँक खात्यातून पैसे काढले आहेत. ती आमच्याशी बोलत नाही. काही गैरप्रकार होऊ शकतो. आम्हाला काळजी वाटते. त्यामुळे त्या मुलीला आमच्या समोर आणा अशी मागणी मुलीच्या नातेवाईकांनी केली आहे. भविष्यात या मुलीबाबत श्रध्दा वालकरची पुनरावृत्ती झाली तर गृहखाते जबाबदार असेल असा इशारा सुनील प्रभू यांनी दिला.

सकाळ पृ-पा २.

# वसईत विकासकामांचा राडारोडा रस्त्यावरच

वसई, ता. २० (बातमीदार) : वसई-विरार शहरात महापालिकेने विविध विकासकामे हाती घेतली आहेत; मात्र या विकासकामांतून तयार होणारा राडारोडा रस्त्यावरच ठेवल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. या प्रकाराने नागरिक त्रस्त झाले असून दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे विकासकामे करत असताना प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षेची काळजी घ्यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



**वसई :** विकासकामांचा राडारोडा रस्त्यावर टाकला जात आहे.

वसई-विरार महापालिकेने चौक सुभोभीकरण, रस्तेदुरुस्ती, गटार यासह विविध विकासकामे हाती घेतली आहेत. यासाठी निविदा काढून विविध कामे ठेकेदाराला देण्यात आली आहेत. पण ही काम करताना निघणारी माती आणि इतर राडारोडा रस्त्यावर टाकला जात आहे. त्यामुळे पादचाऱ्यांसह वाहनाचालकांना त्याचा अडचण निर्माण होत आहे.

विकासकामे सुरू असलेल्या भागाचा आढावा घेऊन राडारोडा, माती हटविण्याच्या सूचना ठेकेदाराला देण्यात येतील.
**- राजेंद्र लाड,** कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग

पाईप गटारासह अन्य कामे प्रशासनाने हाती घेतली आहेत. विकासकामे होत आहेत याचा आनंद आहे; मात्र कुठेही सुरक्षेच्या दृष्टीने उपायोजना करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे शाळेत जाणारी लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांसह प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.
**- महेश सरवणकर,** रहिवासी, वसई

सकाळ पा-नं.१.

# वसईत भररस्त्यात गुंडांची दादागिरी

## हवेत गोळीबार; एकावर तलवारीने वार

नालासोपारा, ता. २० (बातमीदार) : वसईत भररस्त्यात गुंडांच्या दादागिरीचा थरार पाहायला मिळाला. कार अडवून तिघांनी एकावर तलवारीने प्राणघातक हल्ला करत हवेत गोळीबार केल्याची घटना आज सायंकाळी ६ वाजता घडली. या घटनेचा सर्व थरार सीसीटीव्हीत चित्रित झाला आहे.



सीसीटीव्हीत चित्रित झालेला थरार

वसईच्या वालीव येथील नाईकपाडा येथे मनसे कार्यालयाच्या शेजारी ही घटना घडली. बोलेरो गाडीत डुक्कर घेऊन वसईच्या दिशेने जात होती. तेवढ्यात समोरून बोलेरो कंपनीच्या पिकअप गाडीने बोलेरो गाडीला ठोकून रस्त्यावरच अडवले. गाडीतून तिघे बाहेर आले आणि एकाने तलवारीने हरजित सिंग ऊर्फ दादू याच्यावर वार केले. त्यानंतर गाडीतील चार जण फरारी झाले. घटनास्थळी इतर नागरिक वाचवण्यासाठी येऊ नयेत म्हणून दुसऱ्या आरोपीने हवेत गोळीबार केला.

वालीव पोलिसांनी घटनास्थळावरून तलवार आणि बोलेरो गाडी जप्त करून आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे, असे प्रत्यक्षदर्शी मनसेचे पालघर लोकसभा जिल्हाध्यक्ष जयेंद्र पाटील यांनी सांगितले.

लोकसत्ता पा.नं.८.

# चीनमध्ये करोनाच्या उद्रेकाची चिन्हे

एपी, बीजिंग

**चीनमध्ये सोमवारी** दोन करोना रुग्णांचा मृत्यू झाल्याची माहिती येथील आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली. मात्र, अनधिकृत वृत्तानुसार चीनमध्ये करोना महासाथीचा उद्रेक होण्याची चिन्हे दिसत आहेत. करोनाबाधितांमध्ये मोठी वाढ झाल्याचे अनधिकृतरित्या सांगण्यात येत आहे. सोमवारी झालेले दोन्ही मृत्यू बीजिंगमध्ये झाले आहेत. चीनमध्ये अवलंबण्यात येत असलेले 'शून्य कोविड' धोरण (झिरो कोविड) शिथील केल्यानंतर पहिल्या आठवड्यात या दोन मृत्यूंची नोंद झाली.

हे धोरण शिथील झाल्यानंतर करोनाच्या प्रादुर्भावात वाढ अपेक्षित होतीच. मात्र, मृत रुग्णांचे नातलग व अंत्यसंस्कार करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी करोनामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत मोठी वाढ होत असल्यास दुजोरा दिला. सरकारकडून कारवाईच्या भीतीने अनेकांनी आपले नाव गुप्त राखण्याच्या अटीवर ही माहिती दिली. चीनमध्ये ४ डिसेंबरपासून करोनाबाधिताच्या मृत्यूची नोंद झाली नव्हती. या मृत्यूंमुळे, राष्ट्रीय आरोग्य आयोगाने गेल्या तीन वर्षांत चीनमध्ये कोविड-१९ मुळे झालेल्या एकूण मृत्यूंची संख्या पाच हजार २३७ वर गेली आहे. चीनमध्ये आतापर्यंत एकूण तीन लाख ८० हजार ४५३ करोना रुग्णसंख्या नोंदवली गेली.

## नववर्षाच्या गर्दीची चिंता, अपुऱ्या आरोग्य सुविधा



जानेवारीत चीनमध्ये नवीन चांद्र वर्षाच्या प्रारंभानिमित्त प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढणार आहे. या काळात स्थलांतरित कामगार आपापल्या गावी परततील. या काळात उसळलेल्या गर्दीत करोना प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढण्याचा धोका आहे. तसेच लहान शहरे व ग्रामीण भागातील आरोग्य सुविधांवर ताण येईल. या सुविधा अपुऱ्या पडण्याची चिंता प्रशासनास सतावत आहे.

## चीनमधील उत्परिवर्तनाची अमेरिकेस चिंता

**वॉशिंग्टन :** अनेक देशांमध्ये करोना महासाथीवर नियंत्रण मिळाले आहे. मात्र, जगातील सर्वाधिक लोकसंख्येच्या चीनमध्ये करोना रुग्णांची संख्या सातत्याने वाढत असल्याने 'कोविड-१९' विषाणूच्या नवीन उत्परिवर्तनाची भीती अमेरिकेने व्यक्त केली आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते नेड प्राइस यांनी सांगितले, की सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, जगभरात कुठेही आजार-विकारामुळे कुणीही बळी पडता कामा नये, अशी स्थिती आपल्याला निर्माण करायची आहे. कोविडचा विषाणू मात्र अजूनही पसरत असूनही त्यात उत्परिवर्तनाची अद्याप क्षमता आहे. त्यामुळे त्याचा अद्याप जगभरातील मानवजातीला मोठा धोका आहे. या विषाणूने आतापर्यंत केलेले उत्परिवर्तन पाहता आम्ही जगभरातील देशांना करोना प्रतिबंधासाठी निश्चितपणे मदतीस तत्पर आहोत. चीनमध्येही या विषाणूचा वाढता प्रादुर्भाव तातडीने थांबवणे सर्वांसाठी हितकारक आहे. चीनमधील करोना रुग्णांची संख्या, मृत्यूबद्दलची पारदर्श माहिती मिळत नसल्याबद्दल अमेरिकेस चिंता वाटते.

## जागतिक अर्थव्यवस्थेला फटका बसण्याची भीती

जगभरातील आरोग्य तज्ज्ञ व आरोग्याधिकाऱ्यांची चीनमधील करोनाच्या स्थितीवर बारकाईने लक्ष आहे. याचा जागतिक अर्थव्यवस्थेला नेमका कसा फटका बसेल, याचा कयास लावण्याचा अटोकाट प्रयत्न अमेरिका व युरोपातील अधिकारी करत आहेत. कारण चीनमधील करोनाच्या उद्रेकामुळे 'कॉर्पोरेट' स्तरावरील पुरवठा साखळ्यांना मोठी बाधा येऊ शकते. अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे प्रवक्ते जॉन किर्बी यांनी स्पष्ट केले की, आम्ही चीनला मदत करण्यास तयार आहोत. चीन सरकारच्या पोलादी धोरणामुळे त्यांना मदत कशी मदत करणार याविषयी जगातील देशांमध्ये गोंधळाची स्थिती आहे.

ही संख्या इतर प्रमुख करोनाबाधित देशांच्या तुलनेत खूपच कमी आहे. परंतु, ही माहिती नोंदवण्याची पद्धत व आकडेवारीच्या विश्वासार्हतेविषयी जागतिक स्तरावर शंका उपस्थित करण्यात येत आहे. चीनचे आरोग्य अधिकारी केवळ थेट करोनामुळे मृत्युमुखी पडलेल्यांची करोना मृत्यू म्हणून गणना करतात. मधुमेह आणि हृदयविकार असलेल्या रुग्णांना करोना झाल्यास त्यांच्या मृत्यूची जोखीम वाढते. बहुसंख्य देशांतील करोनाविषयी मार्गदर्शक तत्त्वांनुसार या रुग्णांचाही समावेश करोना मृत्यूंमध्ये केला जातो.

चीनमध्ये अपुऱ्या माहिती व आकडेवारीमुळे करोनाच्या उद्रेकाची दिशा समजणे अधिक कठीण झाले आहे. तथापि, आर्थिक व्यवहारांतील मोठी घसरण व विषाणू प्रादुर्भावाचे अनधिकृत पुरावे मोठ्या लाटेची चिन्हे दर्शवत आहेत. आरोग्यतज्ज्ञांनी येत्या एक-दोन महिन्यांत या महासाथीची मोठी लाट येण्याची भीती व्यक्त केली. त्यामुळे विशेषतः ज्येष्ठ नागरिकांच्या मृत्यूचे प्रमाण वाढण्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

पुण्यनगरी ५.५.१.

**In Short**

## तीन हजारांची लाच घेताना पोलिसाला अटक

। नालासोपारा : विरार पश्चिमेकडील अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यातील पोलीस हवालदार कमलाकर मदने (४४) याला ३ हजारांची लाच घेताना मंगळवारी अटक करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ही कारवाई केली. जामीन मिळवून देण्याच्या मोबदल्यात मदने यांनी १५ हजारांची लाच मागितली होती.तक्रारदारांच्या वडिलांचे जामीनपात्र वॉरंट अर्नाळा पोलीस ठाण्यात आले होते. त्यामध्ये तक्रारदाराला अटक न करता जामीन भरून न्यायालयात अहवाल सादर करण्यात आला होता. त्या मोबदल्यात हवालदार कमलाकर मदने याने १५ हजारांच्या लाचेची मागणी केली. तडजोडीअंती ही रक्कम १० हजारांची ठरली. मंगळवारी लाचेच्या रकमेतील ३ हजार रुपये स्वीकारताना कमलाकर मदने यांना पालघर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधीक्षक नवनाथ जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक स्वपन बिश्वास, अमित चव्हाण, विलास भोये, नितीन पागधरे, निशा मांजरेकर, दीपक सुमडा, नवनाथ भगत, सखाराम दोडे, स्वाती तारवी या पथकाने ही कारवाई केली.

# साईकिल चोरी करने वाला कॉलेज स्टूडेंट गिरफ्तार



**प्रात:काल संवाददाता**

**मुंबई।** नालासोपारा पूर्व के आचोले पुलिस की डिटेक्शन ब्रांच टीम ने एक साईकिल चोर को गिरफ्तार किया है।

बताया जा रहा है कि चोर कॉलेज स्टूडेंट है और महेंगी गियर वाली साईकिल चोरी करके अपना शौक पूरा करता था। बतादे की 15 दिसंबर 2020 को शाम शंकर पाटील ने अपने बेटे की साईकिल चोरी होने की रिपोर्ट आचोले पुलिस स्टेशन में दर्ज कराई थी। पुलिस स्टेशन की डिटेक्शन ब्रांच टीम ने छानबीन शुरू की। टीम ने घटनास्थल के आसपास लगे सीसीटीवी फुटेज खंगालने पर एक संदिग्ध युवक की पहचान की गई। उसके बाद पुलिस ने चोर युवक की तलाश शुरू क दी गई। इस बीच एक युवक महेंगी साईकिल चलाते हुए पाया गया, उसे पूछने पर सही उत्त नहीं दे पाया तो उसे पुलिस स्टेशन ले जाया गय और पूछताछ की गई। पूछताछ में युवक ने साईकिल चोरी करने की बात कबूली एव अपना नाम राजकुमार गिरीश मेवाड़ (18) नालासोपारा पूर्व का रहिवासी बताया। पुलिस टीमने उसकी निशानदेही पर अलग अलग कंपनी की 98 हजार रुपये कीमत की 11 साईकिलें बरामद की। गिरफ्तार युवक 12 वीं का स्टूडेंट है।



# महागड्या सायकल चोरणाऱ्याला अटक

## ११ सायकल जप्त



**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

आचोळे पोलीस ठाणे हद्दीत महागड्या सायकल चोरी करणाऱ्या १८ वर्षीय मुलाला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून ११ सायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

आचोळे पोलीस ठाणे हद्दीत राहणारे श्याम शंकर पाटील यांचा मुलगा स्मशानभूमी रोड, एव्हरशाईन, नालासोपारा येथील रस्त्यावर सायकल उभी करून पात्र विधीसाठी गेला असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्याची सायकल चोरुन नेली होती. त्याबाबत आचोळे पोलीस ठाण्यात १७ डिसेंबर रोजी भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. वसई- नालासोपारा परिसरात तसेच आचोळे पोलीस ठाणे हद्दीमध्ये सायकल चोरीचे गुन्हे अनेक घडत आहेत. हे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठांनी चोराचा शोध घेण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे आचोळे पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार गस्त करत असताना १८ डिसेंबर रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास नालासोपारा पूर्व येथील वसंतनगरी ते आचोळे गावाकडे जाण्याऱ्या रस्त्यावर एक मुलगा सायकल चालवत घेऊन जात असताना मिळून आला. त्याला थांबवून त्या सायकलबाबत विचारपूस केली असता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. त्यामुळे त्याला सायकलसह पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्यावेळी चोरी गेलेली हीच असल्याचे दिसून आले. आरोपी राजकुमार गिरीष मेवाडा याने ती सायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास अटक करण्यात आली.

My Thane Edition
Dec 21, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# Magic pen used to forge cheques

The Navghar police in Bhayandar have arrested a 38-year-old fraudster for his alleged involvement in duping people by taking crossed and cancelled cheques inked with erasable (magic) pen on the pretext of securing loans for them. The action followed in response to a complaint filed by a 56-year-old businessman who was cheated of Rs1,48,500 by the accused under the guise of providing a loan from a well-known non-banking financial company. The suspect, Jigar Dhirajlal Kareliya, collected the Aadhaar card, Pan card, GST registration papers and bank statements to check eligibility and later took four crossed cheques as security deposit to process the loan. However, the complainant was shocked to learn that Rs1,48,500 had been fraudulently withdrawn from his bank account.

er.freepres[illegible]

THE FREE PRI

# पुलिस कमिश्नर द्वारा महिला पुलिस कक्ष का उद्घाटन

## महिला ट्रैफ़िक पुलिस को मिली सुविधाएं

**विजय महाजन**

**मुंबई हमारा मेट्रो ब्यूरों** मीरा भाईदर वसई विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत आने वाले काशिमीरा ट्रैफिक पुलिस विभाग की महिला पुलिस कर्मचारियों और अधिकारियों के लिए पुलिस कम्पांउड के अंदर ही विश्राम कक्ष बनाया गया है और उसके अंदर ही टॉयलेट, बाथरूम की सुविधा भी उपलब्ध करवाई गई है द्य इसके अलावा रिकार्ड रूम, ऑफिस रूम दो और कक्ष बनाए गए है

जिसका उद्घाटन पुलिस कमिश्नर मधुकर पांडे के हाथो से हुआ द्य इस उपलक्ष मे मीरा भाईदर के ट्रैफिक विभाग द्वारा पाठ पूजा का आयोजन भी रखा गया द्यपूजा के बाद आए हुए तमाम पुलिस अधिकारियों और कर्मचारियों के लिए भोजन की व्यवस्था की गई द्य ट्रैफ़िक विभाग के एसीपी कैलाश चव्हाण और सीनियर पुलिस निरीक्षक रमेश भामे ने इस कार्यक्रम की जानकारी देते हुये बताया कि मीरा भाईदर महानगरपालिका और पुलिस के फ़ंड से ये सुविधाएं उपलब्ध हुई है, और जब से मीरा भाईदर का ट्रैफ़िक विभाग यहां बनाया गया पहली बार यहां पाठ पूजा का आयोजन किया गया है इस मोके पर मीरा भाईदर वसइ विरार पुलिस आयुक्तालय के अडिशनल कमिश्नर श्रीकांत पाठक, डिप्टी कमिश्नर प्रकाश गायकवाड, सहायक पुलिस कमिश्नर शशिकांत भोसले, क्राइम ब्रांच के सीनियर पुलिस निरीक्षक अविराज कुराडे,काशिमिरा के सीनियर पुलिस निरीक्षक संजय हजारे के साथ अन्य कई अधिकारी और कर्मचारी मौजूद रहे।



दैनिक
R.N.I. NO MAHHIN/2008/25162
# मुंबई केसरी टाइम्स
एक साथ प्रकाशित, पालघर, ठाणे, मुंबई, www.mumbaikesaritimes.com
वर्ष : 15 अंक : 198 बुधवार 21 दिसम्बर 2022 मूल्य 2 रुपए Post-Reg- No. PLG/95/2020/2022 पृष्ठ : 08

## शहर में महंगी साइकिल चोरी करने वाला शातिर अपराधी गिरफ्तार

**वसई।** एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत आचोले पुलिस स्टेशन की डिटेक्शन ब्रांच की टीम ने साइकिल चोरी करने के मामले में एक शातिर चोर को गिरफ्तार कर उसके पास से 98 हजार रुपये का माल जप्त किया है,तथा 4 अपराधों की गुत्थी सुलझा ली है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि 15 दिसंबर को शिकायतकर्ता शाम शंकर पाटील (46) का लड़का स्मशानभुमी रोड,एव्हरशाईन,नालासोपारा पूर्व साइकिल खड़ा किया था,किसी अज्ञात चोर ने उक्त साइकिल चोर कर फरार हो गया,इस मामले में आचोले थाने में अज्ञात चोर के ऊपर एफआईआर दर्ज किया गया था। पुलिस ने बताया कि वसई-नालासोपारा क्षेत्र एवं आचोले थाना क्षेत्र के साथ ही साइकिल चोरी के अपराध एवं उक्त अपराध का पर्दाफाश करने के लिए वरिष्ठ पुलिस अधिकारी ने आचोले थाने की डिटेक्शन ब्रांच के अधिकारियों एवं कर्मचारियों को अज्ञात चोर की तलाश करने के निर्देश दिये थे,डिटेक्शन ब्रांच के अधिकारी/कर्मचारियों द्वारा तकनीकी विश्लेषण व सीसीटीवी फुटेज के आधार पर अज्ञात चोर का पता लगाया जा रहा है,18 दिसंबर को शाम 5.30 बजे आचोले थाना डिटेक्शन ब्रांच के अधिकारी व कर्मचारी थाना क्षेत्र में गश्त कर रहे थे,इसी दरम्यान फायर ब्रिगेड,कार्यालय, नालासोपारा पूर्व वसंतनगरी से आचोले गांव-वसंतनगरी गेट वन की ओर जाने वाली सड़क पर एक शख्स [illegible] कंपनी नारंगी और काले रंग वाली साइकिल पर सवार पाया गया।उक्त शख्स पर शक होने पर उसे रोककर उक्त साइकिल के बारे में पूछताछ की,जब वह इधर-उधर को जवाब देने लगा तो उसे साइकिल समेत थाने लाया गया और जब थाने के रिकॉर्ड की जांच की गई तो पता चला कि उक्त अपराध में चोरी की साइकिल और आरोपी के पास से साइकिल बरामद कर ली गई है।पुलिस ने बताया कि आरोपी राजकुमार गिरीष मेवाडा को गिरफ्तार कर लिया गया,इसके पास से कुल 11 साइकिल जप्त कर कुलमिलाकर 98 हजार रुपये का माल जप्त कर आगे की विवेचना कर रही है।



मूल्य ₹

दैनिक दबंग दुनिया

मुंबई, बुधवार, 21 दिसंबर 2022

निष्पक्ष नज़र, निष्पक्ष

# पुलिस के हाथ लगा साइकिल चोर

वसई : एमबीवीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत आचोले पुलिस स्टेशन की डिटेक्शन ब्रांच की टीम ने साइकिल चोरी करने के मामले में एक शातिर चोर को गिरफ्तार कर उसके पास से 98 हजार रुपये का माल जप्त किया है,तथा 4 अपराधों की गुत्थी सुलझा ली है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि 15 दिसंबर को शिकायतकर्ता शाम शंकर पाटील (46) का लड़क



स्मशानभुमी रोड,एव्हरशाईन,नालासोपारा पूर्व साइकिल खड़ा किय था,किसी अज्ञात चोर ने उक्त साइकिल चोर कर फरार हो गया,इस मामले में आचोले थाने में अज्ञात चोर के ऊपर एफआईआर दर्ज किय गया था। पुलिस ने बताया कि वसई-नालासोपारा क्षेत्र एवं आचोले थान क्षेत्र के साथ ही साइकिल चोरी के अपराध एवं उक्त अपराध क पदार्फाश करने के लिए वरिष्ठ पुलिस अधिकारी ने आचोले थाने की डिटेक्शन ब्रांच के अधिकारियों एवं कर्मचारियों को अज्ञात चोर की तलाश करने के निर्देश दिये थे,डिटेक्शन ब्रांच के अधिकारी/कर्मचारियो द्वारा तकनीकी विश्लेषण व सीसीटीवी फुटेज के आधार पर अज्ञात चोर का पता लगाया जा रहा है,18 दिसंबर को शाम 5.30 बजे आचोले थाना डिटेक्शन ब्रांच के अधिकारी व कर्मचारी थाना क्षेत्र में गश्त कर रहे थे,इसी दरम्यान फायर ब्रिगेड,कार्यालय, नालासोपारा पूर्व वसंतनगरी से आचोले गांव-वसंतनगरी गेट वन की ओर जाने वाली सड़क पर एक शख्स श्वरएछड कंपनी नारंगी और काले रंग वाली साइकिल पर सवार पाया गया।उक्त शख्स पर शक होने पर उसे रोककर उक्त साइकिल के बारे में पूछताछ की,जब वह इधर-उधर को जवाब देने लगा तो उसे साइकिल समेत थाने लाया गया और जब थाने के रिकॉर्ड की जांच की गई तो पता चला कि उक्त अपराध में चोरी की साइकिल और आरोपी के पास से साइकिल बरामद कर ली गई है।पुलिस ने बताया कि आरोपी राजकुमार गिरीष मेवाडा को गिरफ्तार कर लिया गया,इसके पास से कुल 11 साइकिल जप्त कर कुलमिलाकर 98 हजार रुपये का माल जप्त कर आगे की विवेचना कर रही है।

# वसई - नालासोपारा एवं आचोले थाना क्षेत्र में फैला था साइकिल चोरी का आतंक, एक पकड़ा गया

अजहर शेख : संवाददाता

**वसई** : एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत आचोले पुलिस स्टेशन की डिटेक्शन ब्रांच की टीम ने साइकिल चोरी करने के मामले में एक शातिर चोर को गिरफ्तार कर उसके पास से ९८ हजार रुपये का माल जप्त किया है, तथा ४ अपराधों की गुत्थी सुलझा ली है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि १५ दिसंबर को शिकायतकर्ता शाम शंकर पाटील (४६) का लड़का स्मशानभुमी रोड, एव्हरशाईन, नालासोपारा पूर्व साइकिल खड़ा किया था, किसी अज्ञात चोर ने उक्त साइकिल चोर कर फरार हो गया, इस मामले में आचोले थाने में अज्ञात चोर के ऊपर एफआईआर दर्ज किया गया था। पुलिस ने बताया कि वसई-नालासोपारा क्षेत्र एवं आचोले थाना क्षेत्र के साथ ही साइकिल चोरी के अपराध एवं उक्त अपराध का पर्दाफाश करने के लिए वरिष्ठ पुलिस अधिकारी ने आचोले थाने की डिटेक्शन ब्रांच के अधिकारियों एवं कर्मचारियों को अज्ञात चोर की तलाश करने के निर्देश दिये थे, डिटेक्शन ब्रांच के अधिकारी/कर्मचारियों द्वारा तकनीकी विश्लेषण व सीसीटीवी फुटेज के आधार पर अज्ञात चोर का पता लगाया जा रहा है,१८ दिसंबर को शाम ५.३० बजे आचोले थाना डिटेक्शन ब्रांच के अधिकारी व कर्मचारी थाना क्षेत्र में गश्त कर रहे थे, इसी दरम्यान फायर ब्रिगेड, कार्यालय, नालासोपारा पूर्व वसंतनगरी से आचोले गांव-वसंतनगरी गेट वन की ओर जाने वाली सड़क पर एक शख्स [illegible] कंपनी नारंगी और काले रंग वाली साइकिल पर सवार पाया गया।उक्त शख्स पर शक होने पर उसे रोककर उक्त साइकिल के बारे में पूछताछ की, जब वह इधर-उधर को जवाब देने लगा तो उसे साइकिल समेत थाने लाया गया और जब थाने के रिकॉर्ड की जांच की गई तो पता चला कि उक्त अपराध में चोरी की साइकिल और आरोपी के पास से साइकिल बरामद कर ली गई है। पुलिस ने बताया कि आरोपी राजकुमार गिरीष मेवाडा को गिरफ्तार कर लिया गया, इसके पास से कुल ११ साइकिल जप्त कर कुलमिलाकर ९८ हजार रुपये का माल जप्त कर आगे की विवेचना कर रही है।



# अर्धवट माहितीचे स्टिकर लावणाऱ्या वाहनांवर होणार कारवाई

भाईंदर - मीरा-भाईंदर शहरात एकीकडे प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांमध्ये वाहन चालक-मालकाची माहिती व हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध असणे बंधनकारक आहे. मात्र शहरातील काही प्रवासी वाहतूक करणारे वाहनचालक त्यांची अर्धवट माहिती उपलब्ध करून प्रवाशांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असल्याचे समोर येत आहे. यामुळे प्रवासी वाहनांतून प्रवास करणाऱ्या महिला स्वतःला असुरक्षित समजू लागल्या असल्याचे पल्लवी चव्हाण (प्रवासी) यांनी सांगितले आहे. वाहतूक पोलिसांकडून दररोज रिक्षांवर करण्यात येणाऱ्या कारवाईची आकडेवारी तर भली मोठी असते, मात्र त्यांच्या अर्धवट माहितीसारख्या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे.

प्रवासी वाहनांतून प्रवास करताना महिलांवर विनयभंगासारखे कोणतेही प्रकार घडू नयेत, याकरिता मीरा-भाईंदर शहरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व रिक्षा, बस, टॅक्सीमध्ये वाहनचालकांची माहिती व प्रवाशांच्या मदतीकरिता हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध करण्यास सांगण्यात आले होते. गेल्या काही दिवसांपासून शहरात एक वेगळाच प्रकार घडत आहे. शहरातील काही रिक्षांमध्ये प्रवाशाकरिता उपलब्ध करण्यात येणाऱ्या माहितीमध्ये स्टिकरवर फक्त हेल्पलाइन क्रमांक उपलब्ध करण्यात आलेला असून, त्या फॉर्मवर रिक्षा चालक-मालक यांचे फोटो देखील लावण्यात आलेले आहेत, मात्र रिक्षाचालक हा कोणी तिसराच व्यक्ती असतो. यामुळे उद्या एखाद्या महिलेसोबत कोणता चुकीचा प्रकार घडला, तर अर्धवट व चुकीच्या माहितीमुळे संबंधित व्यक्तीचा शोध घेणे पोलिसांना कठीण जाणार आहे.

प्रवासी वाहनांच्या आत लावण्यात आलेल्या फॉर्ममध्ये वाहन चालकाचे नाव, संपूर्ण पत्ता, फोन नंबर, लायसन्स नंबर व मुदत, परमिट धारकाचे नाव, पत्ता,परमिट नंबर, फोन नंबर, आधार कार्ड क्रमांक इत्यादी उपलब्ध असणारी माहिती योग्य आहे का व माहितीमध्ये देण्यात आलेली व्यक्तीच रिक्षा चलावत आहे का, यावर लक्ष ठेवणे वाहतूक पोलिसांचे काम आहे. वाहतूक पोलिसांनी कारवाईदरम्यान रिक्षात लावण्यात आलेल्या माहितीच्या फॉर्मवर देखील लक्ष द्यावे व माहिती अपूर्ण अथवा चुकीची असल्यास त्यावर करवाई करण्यात यावी, अशी मागणी प्रवासी करू लागले आहेत. याबाबत वाहतूक पोलीस निरीक्षक रमेश भामे यांना विचारले असता त्यांनी रिक्षांची तपासणी करून स्टिकर चुकीचे असणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्याबाबत कर्मचाऱ्यांना सूचना देण्यात आल्याचे सांगितले आहे. त्याचबरोबर स्टिकर न लावणाऱ्या वाहनांवर सतत कारवाई चालू असल्याचे सांगितले आहे.

दैनिक
# आमची मुंबई
ठाणे/पालघर येथून एकाचवेळी प्रकाशित.
वर्ष : ११ | अंक. २५५ | बुधवार २१ डिसेंबर २०२२ | Post-Reg-No. PLG/158/2022-2024 | रु. २ | पाने: ०८

# शहरातील महागड्या दुचाकी चोरणाऱ्या सराईत गुन्हेगाराला अटक

**वसई.** MBBV पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणाऱ्या आचोळे पोलीस ठाण्याच्या तपास शाखेच्या पथकाने दुचाकी चोरीच्या गुन्ह्यात एका चोरट्याला अटक केली असून त्याच्याकडून ९८ हजार रुपयांचा माल जप्त केला असून, ४ गुन्ह्यांचे गूढ उकलले आहे. पोलीस अधिकाऱ्याने मंगळवारी ही माहिती दिली. पोलिसांनी सांगितले की, १५ डिसेंबर रोजी तक्रारदार शाम शंकर पाटील (४६) यांच्या मुलाने स्मशानभूमी रोड, एव्हरशाईन, नालासोपारा पूर्वेला सायकल पार्क केली होती. एफआयआर दाखल करण्यात आला. वसई-नालासोपारा परिसर व आचोळे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी व सदर गुन्हा उघडकीस आणण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी आचोळे पोलीस ठाण्याच्या तपास शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शोध घेण्याच्या सूचना दिल्याचे पोलिसांनी सांगितले. अज्ञात चोर. तांत्रिक विश्लेषण व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे अज्ञात चोरट्याचा शोध तपास शाखेचे अधिकारी/कर्मचारी करीत आहेत.ब्रिगेड, कार्यालय, नालासोपारा पूर्व वसंतनगरी येथून आचोळे गाव-वसंतनगरीकडे जाणाऱ्या रस्त्यावर गेट वन येथे एक व्यक्ती विवेलो कंपनीची केशरी व काळ्या रंगाची सायकल चालवत असल्याचे आढळून आल्याने सदर व्यक्तीला संशय आल्याने त्याला थांबवून सदर दुचाकीची चौकशी केली असता तो इकडे तिकडे जाब विचारू लागला असता त्याला सोबत पोलीस ठाण्यात आणण्यात आले. सायकल व पोलीस ठाण्यातील रेकॉर्ड तपासले असता सदर गुन्ह्यातील आरोपींकडून चोरीची सायकल व सायकल जप्त करण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून आरोपी राजकुमार गिरीश मेवाडा याला अटक करण्यात आली आहे. गया, त्याच्या ताब्यातून एकूण ११ सायकली असा एकूण ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची चर्चा आहे.



1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 26 अंक-187 मुंबई, बुधवार 21 दिसंबर 2022 पृष्ठ-12 मूल्य :2.00

# 11 साइकिल के साथ एक चोर गिरफ्तार

**वसईः** एमबीबीवी पुलिस आयुक्तालय अंतर्गत आचोले पुलिस स्टेशन की डिटेक्शन ब्रांच की टीम ने साइकिल चोरी करने के मामले में एक शातिर चोर को गिरफ्तार कर उसके पास से 98 हजार रुपये का माल जप्त किया है,तथा 4 अपराधों की गुत्थी सुलझा ली है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने मंगलवार को दी है। पुलिस ने बताया कि 15 दिसंबर को शिकायतकर्ता शाम शंकर पाटील (46) का लड़का स्मशानभुमी रोड,एव्हरशाईन,नालासोपारा पूर्व साइकिल खड़ा किया था,किसी अज्ञात चोर ने उक्त साइकिल चोर कर फरार हो गया। 18 दिसंबर



को शाम 5.30 बजे आचोले थाना डिटेक्शन ब्रांच के अधिकारी व कर्मचारी थाना क्षेत्र में गश्त कर रहे थे,इसी दरम्यान फायर ब्रिगेड,कार्यालय, नालासोपारा पूर्व वसंतनगरी से आचोले गांव-वसंतनगरी गेट वन की ओर जाने वाली सड़क पर एक शख्स नारंगी और काले रंग वाली साइकिल पर सवार पाया गया। उसे रोककर उक्त साइकिल के बारे में पूछताछ की,जब वह इधर-उधर को जवाब देने लगा तो उसे साइकिल समेत थाने लाया गया । पुलिस ने बताया कि आरोपी राजकुमार गिरीष मेवाडा को गिरफ्तार कर लिया गया,इसके पास से कुल 11 साइकिल जब्त कर कुल मिलाकर 98 हजार रुपये का माल जब्त किया गया है।